# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १४९** **दिनांक ०९/०६/२०२१**

## कोकेन या अंमली पदार्थाची विक्री करणा-या विदेशी नागरीकास ९५,६०,०००/- रुपये किंमतीच्या मुद्देमालासह तुळींज पोलीस ठाणे येथे अटक

दिनांक ०७/०६/२०२१ रोजी माणिकपुर पोलीस ठाण्याचे स.पो.नि.सचिन सानप यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, तुळींज पोलीस ठाण्याचे हद्दित, नुर बिल्डींग, ९० फीट रोड, प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व या ठिकाणी एक विदेशी नागरीक अंमली पदार्थाची विक्री करण्याकरीता येणार आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने पोलीस पथक सापळा रचुन दोन पंचासह घटनास्थळी रवाना झाले. सायंकाळी १८.४५ वा.चे दरम्यान नुर बिल्डींग, ९० फीट रोड, प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व येथे एक विदेशी इसम पायी चालत येत असताना गुप्त बातमीदाराने पोलीस पथकास इशारा करुन तोच इसम अंमली पदार्थ विक्री करणारा असल्याचे सांगितले असता पोलीस पथकाने सदर इसमास घेराव घालुन ताब्यात घेतले. त्यानंतर सदर विदेशी इसमाची झडती घेतली असता त्याच्याकडे एकुन ४७८ ग्रॅम वजनाची व ९५,६०,०००/- रु.किमंतीची कोकेन अंमली पावडर मिळाली.

सदर घटनेबाबत तुळींज पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.७३९/२१ एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क) सह २१ (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन अंमली पदार्थाची विक्री करणारा विदेशी इसम नामे सॅम्युयल फेमी, वय ३० वर्षे, रा.ठी. प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व यांस अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री.संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र.०२, श्री.अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त तुळींज, श्री.राजेंद्र कांबळे, प्रभारी अधिकारी तुळींज यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे पो.नि./श्री.श्याम आपेट, पोउपनिरी/श्री.जगताप, सफौ/पडेलकर, पोहवा/किरण चौधरी, पोना/सय्यद, पोशि/ शिंदे यांचे सह माणिकपुर पोलीस ठाण्याचे सपोनि/श्री.सचिन सानप, मपोउपनिरी/रोहिनी डोके, पोहवा/शैलेश पाटील, चौधरी, पोना/ताकवले, धनंजय चौधरी, पोशि/गोपाल कोळेकर यांचे पथकाने केली आहे.

..............oooooo................